परिपत्रक क्र. २

(१) शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग – इ.१० वी आणि
(२) शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग – इ.९ वी :

**रयत शिक्षण संस्था,सातारा.**

**कर्मवीर समाधी परिसर, सातारा.**

माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग

परिपत्रक क्र. २ दिनांक १०/४/२०१८

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था,सातारा.
यांना ----------

## १) शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग (इ.१० वी) :

१. संस्थेतील हुषार विद्यार्थी एस.एस.सी. परीक्षेत गुणवत्तेत येण्याच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून संस्थेतर्फे विभागीय पातळीवर, विभागीय कार्यालयामार्फत हुशार विद्यार्थी गुणवत्तावाढ वर्ग घेतले जात आहेत. सदरचे वर्ग उपयुक्त ठरलेले आहेत. सन २०१८ च्या उन्हाळी सुट्टीमध्ये याप्रमाणे विभागवार वर्ग घेतले जाणार आहेत.

२. हा वर्ग दर्जेदार होण्यासाठी प्रत्येक शाखाप्रमुखाने दक्ष असावे. या वर्गासाठी निवड झालेले आपल्या विद्यालयातील विद्यार्थी उन्हाळी वर्गाला उपस्थित राहतील, संपूर्ण वर्ग कालावधीत टिकून राहतील याची दक्षता आपण घ्यावी. तसेंच निवड झालेल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना योग्य मार्गदर्शन करून या वर्गातून हुशार विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त फायदा होण्याच्या दृष्टीने शाखाप्रमुखांना जे जे करणे शक्य आहे ते ते त्यांनी करून संस्थेची ही योजना यशस्वी होईल या दृष्टीने प्रयत्न करावेत.

३. तेंव्हा या गुणवत्तावाढ वर्गासाठी आपल्या विद्यालयातील हुशार विद्यार्थ्यांची माहिती दि. १७/४/२०१८ पर्यंत आपल्या विभागीय कार्यालयाकडे पोहोच होईल अशा रीतीने पाठवावी.

४. सदर वर्गाच्या नियोजन व कार्यवाहीबाबत आपल्या विभागीय कार्यालयामार्फत परिपत्रकाने सूचना दिल्या जातील. त्याप्रमाणे आपण कार्यवाही करावयाची आहे.

५. सन २०१६-२०१७ मध्ये इ.८ वीच्या वार्षिक परीक्षेत व सन २०१७-२०१८ मध्ये इ.९ वीच्या पहिल्या सत्र परीक्षेत ८० टक्केपेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालील नमुन्यात आपल्या विभागीय कार्यालयाकडे पाठवावी.

| अ. नं. | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | सन २०१६-२०१७ मधील इ.८ वी वार्षिक परीक्षेत मिळालेले शे.गुण (प्रत्येक विषयाचे श्रेणी पत्रक) | सन २०१७-२०१८ मध्ये इ.९ वीचे पहिल्या सत्र परीक्षेत मिळालेले शे.गुण | रकाना ३ व ४ मधील शेकडा गुणांची बेरीज | सरासरी शेकडा गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

## २) शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग (इ.९ वी) :

१. इ.१० प्रमाणेच इ.९ वीतील संस्थेतील हुशार विद्यार्थ्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासून संस्थेच्या सर्व विभागात संस्थेतर्फे विभागीय पातळीवर, विभागीय कार्यालयामार्फत गुणवत्तावाढ वर्ग चालविले जात असून, यावर्षीही असे वर्ग संस्थेच्या सर्व विभागात विभागीय कार्यालयामार्फत घेण्यात येणार आहेत. तेंव्हा आपल्या विद्यालयातील हुशार विद्यार्थ्यांची माहिती दि. १७/४/२०१८ पर्यंत आपल्या विभागीय कार्यालयाकडे पोहोच होईल अशा रीतीने पाठवावी.

२. सन २०१६-२०१७ मध्ये इ.७ वीच्या वार्षिक परीक्षेत व सन २०१७-२०१८ मध्ये इ.८ वीच्या पहिल्या सत्र परीक्षेत ८० टक्केपेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालील नमुन्यात आपल्या विभागीय कार्यालयाकडे पाठवावी.

| अ. नं. | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | सन २०१६-२०१७ मधील इ.७ वी वार्षिक परीक्षेत मिळालेले शे.गुण (प्रत्येक विषयाचे श्रेणी पत्रक) | सन २०१७-२०१८ मध्ये इ.८ वीचे पहिल्या सत्र परीक्षेत मिळालेले शे.गुण | रकाना ३ व ४ मधील शेकडा गुणांची बेरीज | सरासरी शेकडा गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

३. गुणवत्तावाढ वर्गासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची निवास, भोजनाची व्यवस्था केंद्राचे ठिकाणी केली जाईल. भोजन व स्टेशनरी याचा खर्च विद्यार्थ्यांने स्वतः करावयाचा आहे. याबाबत विभागीय कार्यालयामार्फत कळविण्यात येईल. विद्यार्थ्यांना केंद्रप्रमुखाच्या आज्ञेत वागावे लागेल. ज्या विद्यार्थ्यांचे वर्तन चांगले आहे व जे या योजनेचा फायदा घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांची माहिती आपल्या विभागीय कार्यालयास दि. १७/४/२०१८ पर्यंत मिळेल अशा बेताने पाठवावी. सदर माहिती वेळेत न पाठविली गेल्यास संबंधित हुशार विद्यार्थ्यांस प्रवेश देणे कठीण होणार आहे याची नोंद घ्यावी.

४. सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** या संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

कळावे.

**(श्री.विलास महाडीक)**
**सहसचिव(माध्य.),**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

(१) सर्व इन्स्पेक्टर्स, रयत शिक्षण संस्था, सातारा.

(२) ऑडिटर रयत शिक्षण संस्था, सातारा.